# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१००५

**(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)**

**दूरध्वनी क्रं.** ०२४०-२३३१२७३, २३३४०२५ **फॅक्स** ०२४०-२३४९६६९

**Email** – rbteau@msbte.com, rbteau@gmail.com **Web :** www.msbte.com

जाक्रं.मरातंशिमं/प्राकाऔ/डी-४०/हि.प.२०१५/ज्यादा तास/1577, दिनांक : १३/१०/२०१५

**वेब परिपत्रक,**

प्रति,

प्राचार्य,

या कार्यालयाशी संग्लनित सर्व संस्था.

**विषय** :- परीक्षार्थीचे त्यांच्या संस्था प्रमुखांमार्फत अर्धा तास वेळ वाढवून/ लेखनिक मिळणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई या मुख्यालयामार्फत उन्हाळी व हिवाळी पदविका परीक्षा घेतल्या जातात. परीक्षा कालावधीत या कार्यालयास परीक्षार्थीचे त्यांच्या संस्था प्रमखांमार्फत अर्धा तास वेळ वाढवून मिळणेबाबत तसेच परीक्षार्थ्यास लेखनिक मिळणेबाबत अर्ज प्राप्त होतात. असे अर्ज या प्रादेशिक कार्यालयास सादर करताना संस्था प्रमूखांनी खालील बाबी पडताळून सदर विद्यार्थ्याचे अर्ज या कार्यालयास अग्रेषित करावेत.

- **अर्धा तास वेळ वाढवून मिळणेबाबत.**
  1. संस्था प्रमुखांचा सही व शिक्का नमूद केलेले संस्थेचे पत्र.
  2. संबंधित विद्यार्थ्याचा अर्ज.
  3. संबंधित विद्यार्थ्याचे 40% पेक्षा जास्त अपंगस्त असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राची सांक्षाकित छायांकित प्रत.
  4. विद्यार्थ्याचा नोंदणी क्रमांक (Enrollment No.), सत्र (Semester) उदा.ME4G.
- **लेखनिक मिळणेबाबत.**
  1. संस्था प्रमुखांचा सही व शिक्का नमूद केलेले संस्थेचे पत्र.
  2. संबंधित विद्यार्थ्याचा अर्ज.
  3. विद्यार्थी असमर्थ असल्याबाबतचे डॉक्टराचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
  4. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थीनीचे बोनाफाईड सर्टिफिकेट.
  5. लेखनिक म्हणून बसणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थीनीच्या शाळाचे ना हरकत प्रमाणपत्र.
  6. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा तांत्रिक शिक्षण न घेतलेला व 10 वी पर्यतच शिकलेला असवा.
  7. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा परीक्षार्थीचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.

उपरोक्त अर्ज हे पंधरा दिवस ते तीस दिवस परीक्षा कालावधीच्या आतच या कार्यालयास प्राप्त होणे गरजेचे आहे. तसेच संस्थेच्या पत्रात संस्था प्रमुखांचा तसेच सदर विषय हाताळणाऱ्या लिपीकाचा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी ( Mobile No. & E-mail ID) नमूद करणे अपरिहार्य आहे.

जर परीक्षेआधी एक किंवा दोन दिवस संस्थाकडून अर्ज प्राप्त झाले व त्यानंतर संस्था प्रतिनिधींनी दूरध्वनीद्वारे सदर प्रकरणाचा निपटारा करण्यास घाई केली व सदरचे पत्र टपाल खात्याकडून संस्थेस उशिरा प्राप्त झाले व त्यामुळे जर विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाले तर या गोष्टीस संस्था प्रमुख जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

अपवादात्मक परिस्थितीत जसे एखादया विद्यार्थ्याचा अचानक अपघात झाला किंवा अचानक नैसर्गिक दुर्घटना परीक्षार्थीच्या बाबतीत घडली तरच अशा अर्जाचा विचार करण्यात येईल.

उपसचिव

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,

प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद-०५